**<u>नियमित फौजदारी खटला क्र.३४४/२०१९.</u>**
**<u>नि.क्र.२१.</u>**

**<u>सरकारतर्फे साक्षिदार क्र.१ यांची जबानी</u>**

मी याव्दारे शपथेवर निवेदन करतो की,
**नांव:-** अमोल संभाजी गायकवाड,
**वय:-** ३१ वर्षे, व्यवसाय:- मजुरी,
**रा.** दत्तनगर, गल्ली क्र.१०,
मौजे शहापूर, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपासणी सहायक सरकारी अभियोक्ता श्री.पी.एच.सावंत यांच्यामार्फतः-</u>**

**१.** मी आरोपीला ओळखतो कारण तो माझा मित्र आहे. मी दि.०१/०५/२०१९ सायंकाळी ४.३० वाजता क्रिकेट खेळत होतो. त्यावेळेस आरोपी व माझ्यामध्ये बाचाबाची झाली. सदरचा वाद बाकीच्या मुलांनी मिटविला होता. परंतु, दोन ते तीन दिवसांनंतर मी व ओंकाळ गल्लीतील कट्ट्यावर मोबाईलवर गेम खेळत असताना आरोपीने पाठीमागून येऊन रॉडने माझ्या पाठीत मारले. त्यामुळे मी योगेश गांजवे यांच्या दारात पडलो. त्यानंतर योगेश व त्याचा भाऊ प्रमोद गांजवे यांनी मला आयजीएम दवाखान्यात नेले. तेथून मला पुढील उपचाराकामी सांगली सिव्हिल येथे पाठविण्यात आले. त्यानंतर मिरज येथे सोनोग्राफीसाठी मला नेण्यात आले होते. त्यानंतर मी आयजीएम हॉस्पिटल, इचलकरंजी येथे गेलो. त्यानंतर मी आरोपी विरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार दिली. आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद तीच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२२** देण्यात येत आहे. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे. आरोपीने मला ज्या लोखंडी रॉडने मारहाण केली तो रॉड पाहिल्यास मी ओळखू शकतो. आता मला दाखविण्यात आलेला लोखंडी रॉड तोच आहे. त्यास **आर्टिकल 'ए'** देण्यात येते.
सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.एस.एस.मुदगल</u>.**

**२.** सदर घटनेच्या वेळेस मी गवंडी काम करीत होतो. हे म्हणणे खरे आहे की, गवंडी काम हे दिवसभर असते. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी मी कामावर होतो. साक्षिदार स्वत:हून सांगतो की, सुट्टी होती. घटनेच्या दिवशी कोणता वार होता हे मला सांगता येणार नाही. आरोपी व माझ्यामध्ये क्रिकेटच्या कारणावरुन ज्यावेळी भांडण झाले त्या संदर्भात मी कोठेही तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला दारु पिण्याची सवय आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला सकाळी पण दारु पिण्याची सवय आहे. मी संध्याकाळी दारुचे व्यसन

करतो. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी मी दारु पिऊन पडलो होतो. घटनेच्या वेळी जेथे मी बसलो होतो तेथून गांजवे यांचे घर १५ ते २० फुटांवर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दारु पिऊन पडल्यावर मला ज्या जखमा झाल्या त्याचा गैरफायदा घेऊन आरोपीला पुर्वीच्या वादावरुन अडकविण्यासाठी मी आरोपी विरुध्द खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला प्रत्यक्षात मारहाण केली नाही. आयजीएम दवाखान्यात असताना मला तक्रार देता येत नव्हती कारण मला बोलता येत नव्हते. त्यावेळेस दवाखान्यात माझ्या सोबत माझा मित्र ओंकार व माझी मामी होती.

**प्रश्नः-** ओंकार व मामी यांना फिर्याद द्यायला काही अडचण नव्हती ?
**उत्तरः-** त्यांना घटनेबाबत काहीच माहिती नव्हती.

घटनेच्या दिवशी मला मारहाण झाल्यामुळे व दुस-या दिवशी मी आयजीएमला ॲडमिट असल्यामुळे मला फिर्याद देता आली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

REENA DEEPAK KHARATE
Digitally signed by REENA DEEPAK KHARATE
Date: 2025.06.25 11:57:32 +0530

(आर. डी. खराटे)

दि.२३/०६/२०२५. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इचलकरंजी.